महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५८ /२०२२ दि. १५/०८/२०२२

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** ठाणेनगर वाहतूक उपविभागाच्या हद्दीत दिनांक १९/०८/२०२२ रोजी सकाळी ०७:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो **''गोपाळकाला''** निमित्त १) टेंभीनाका मित्रमंडळ २) टॉवर नाका आनंद चॅरिटेबल ट्रस्ट ३) व्यापारी मित्र मंडळ, ब्राम्हण सभा हॉल, स्टेशन रोड ४) बाळगोपाळ मित्र मंडळ, नारळवाला चाळ, स्टेशन रोड, ठाणे या ठिकाणी विविध संघटनांतर्फे दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. दहीहंडी साजरी करणे करीता मुंबई व ठाणे परिसरातून मोठया प्रमाणात गोविंदा पथके दहिहंडी फोडण्यासाठी येत असतात तसेच नागरीक मोठया संख्याने उपस्थित राहतात. त्या दरम्यान सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित रहावी, या करीता आम जनतेच्या साईसाठी,

**त्याअर्थी,** मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून **आम जनतेच्या सोयीसाठी** खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) जी.पी.ओ. कडून कोर्टनाका मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जी.पी.ओ. चौक येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ठाणे मध्यवर्ती कारागृह कडून क्रिक नाका मार्गे दादोजी कोंडदेव स्टेडियम कडून उजवीकडे वळण घेवून ए–वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कळवा व साकेत मार्गे ठाणे रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना उर्जिता हॉटेल येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने क्रिक नाका मार्गे डावीकडे वळण घेवून दादोजी कोंडदेव स्टेडियम कडून उजवीकडे वळण घेवून ए–वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) ठाणे रेल्वे स्टेशन कडून टॉवर नाका/टेंभीनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस व मोठी वाहने तसेच रिक्षा व चार चाकी लहान वाहने यांना मुस चौक येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे रेल्वे स्टेशन कडून सॅटिस ब्रिज वरून येणाऱ्या परिवहनाच्या सर्व एस.टी. बसेस तसेच टी.एम.टी. च्या सर्व बसेस हया बी केबिन सॅटिस ब्रिज वरून गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच रिक्षा व चार चाकी लहान वाहने सॅटिस ब्रिज खालून स्टेशन रोड मुस चौक मार्गे डावीकडे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना ही दिनांक १९/०८/२०२२ रोजी सकाळी ०७:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अमलात राहिल. सदरची अधिसुचना ही फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( दत्तात्रय कांबळे )**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, नौपाडा, राबोडी, कोपरी वाहतूक उपविभाग ठाणे.